MHAH190001802012

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | – | १०/०२/२०१२ |
| नोंदणी दिनांक | – | १०/०२/२०१२ |
| निकाल दिनांक | – | २४/०४/२०२६ |
| कालावधी | – | वर्षे महिने दिवस |
| | | १४ ०२ १४ |

**सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, शेवगाव, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात.**

**( पिठासीन अधिकारी – वैशाली सं. मोरे )**

**नियमित दिवाणी दावा क्र.८८/२०१२** **निशाणी क्र.१०१.**

**विष्णु सुखदेव घनवट,**
वय:– ५६ वर्षे, कामधंदा :– शेती,
रा. नजिक बाभुळगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर.

**... वादी.**

**विरुध्द**

१. **लक्ष्मण बाबुराव ढोरकुले,**
वय:– ४० वर्षे, कामधंदा :– शेती,

२. **अंबादास बाबुराव ढोरकुले,**
वय:– ४६ वर्षे, कामधंदा :– शेती,

३. **सुभाष बाबुराव ढोरकुले,**
वय:– ५८ वर्षे, कामधंदा :– शेती,

४. **राम बाबुराव ढोरकुले**
वय:– ५३ वर्षे, कामधंदा :– शेती,
सर्व रा. नजिक बाभुळगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर.

**... प्रतिवादी.**

---

दावाः– अनिवार्य मनाई हुकूम व निरंतर ताकीद मनाई हुकुमासाठी.

---

**प्रतिनिधीत्व**

वादीतर्फे विधिज्ञ – श्री. ए. आर. लबडे,

प्रतिवादी तर्फे विधिज्ञ – श्री. एम. व्ही. थोरात.

---

**न्या य नि र्ण य**
**( पारीत दिनांक २४/०४/२०२६ )**

०१. वादी यांनी प्रस्तुतचा दावा अनिवार्य मनाई हुकूम व निरंतर ताकिद मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केला आहे.

**दाव्यातील वादीचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे:–**

०२. मौजे नजिक बाभुळगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर येथील गट क्र.१७६/१/१, क्षेत्र ० हे. ६० आर., याची चतुःसिमा पूर्वेस रस्ता व त्यानंतर गट नं.१७७, पश्चिमेस ओढा व त्यानंतर गट क्र.१७४, १७६ पैकी, दक्षिणेस गट क्र.१७७ आणि उत्तरेस गट नं. १७१, १७२, १७३, ही शेत जमीन त्यामध्ये एक विहीर व तिचे पाणी घेणेचे हक्कासह (सदर मिळकतीस या नंतर " वाद मिळकत " संबोधण्यात येईल.) वादीची खरेदी मालकीची मिळकत आहे.

०३. वाद मिळकत ही वादीने दिनांक २७/१२/१९८३ रोजी खरेदीखताने विकत घेतलेली आहे. त्या अनुषंगाने सदर मिळकतीचा ७/१२ उताऱ्यावर वादीचे नावाची नोंद असून खरेदीखताच्या दिनांकापासून वादी हा सदर मिळकतीचा मालकी हक्काने शांततापूर्वक कब्जे वहिवाट करीत आहे. वादी स्वतः मेहनत, मशागत करीत असून वाद मिळकतीतून उत्पन्न घेत आहे. वाद मिळकतीच्या ईशान्य (पश्चिम–उत्तर)

कोपऱ्यात वादीने सुमारे एक वर्षापूर्वी विहीर खोदली व सदर विहिरीस भरपूर पाणी उपलब्ध आहे. प्रतिवादी यांचा गट नं.१७४ हा वादीच्या मिळकतीच्या पश्चिमेस असून त्या जमिनीवर त्यांचा ताबा आहे. प्रतिवादी यांचा वादीच्या मिळकतीशी कोणताही कायदेशीर संबंध किंवा हक्क नाही. तथापि, वादीने कष्टाने मिळकत विकत घेऊन ती विकसित केली व त्यापासुन चांगले उत्पन्न घेत असल्यामुळे प्रतिवादींना वादीची प्रगती, उत्कर्ष सहन होत नाही. प्रतिवादी हे परस्परांचे सख्खे भाऊ असून त्यांचा मोठा जोड जमाव आहे आणि ते राजकीय ओळखींचा गैरफायदा घेऊन वादीस त्रास देतात. ते वेळोवेळी वादीच्या पिकांचे नुकसान करतात व जनावरे सोडून पिकाची हानी करतात. प्रतिवादी यांनी वादीला त्रास देण्याच्या हेतूने, जरी त्यांना गट नं. १७४ साठी इतर पर्यायी रस्ता उपलब्ध होता तरी तहसीलदार, शेवगाव यांच्याकडून वादीच्या मिळकतीतून रस्ता काढण्याचा आदेश मिळवला. त्या आदेशाविरुद्ध वादीने आर. टी. एस. १८/२०११ हे रिव्हिजन दाखल केले असून मा. उप–विभागीय अधिकारी यांनी तो आदेश स्थगित केला आहे.

०४. प्रतिवादी यांनी दिनांक १८/१२/२०११ रोजी वादीच्या मिळकतीच्या पश्चिमेस असलेल्या नाल्यावर जे. सी. बी. मशिनच्या सहाय्याने अतिक्रमण करून नाल्याचा नैसर्गिक प्रवाह बदलला. त्यांनी नाल्यात चर खोदून पाण्याचा प्रवाह वादीच्या विहिरीकडे वळवला आहे. त्यामुळे वादीची विहीर व जमिनीचे नुकसान होण्याची शक्यता आहे. वादीने प्रतिवादींना स्वतः व मध्यस्थामार्फत ओढयाचा नैसर्गिक प्रवाह पूर्ववत करण्याची विनंती केली. परंतु, प्रतिवादींनी त्यास नकार देऊन अरेरावीची भाषा वापरली. त्यामुळे प्रतिवादींनी ओढयावर केलेले अतिक्रमण, खोदलेला चर व वळण

स्वतःच्या खर्चाने काढून घ्यावे तसेच ओढयाचा नैसर्गिक प्रवाह पूर्ववत करावा (Mandatory Injunction) आणि प्रतिवादींना भविष्यात नाल्याचा प्रवाह बदलणे, अतिक्रमण करणे किंवा वादीस त्रास देणे या करीता निरंतर ताकीद देण्याची (Permanent Injunction) विनंती वादीने केली आहे.

०५. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी हजर होऊन प्रतिवादी क्र.०२ ने निशाणी क्र.२१ वर कैफियत दाखल केली व सदर कैफियत प्रतिवादी क्र.१, ३ व ४ यांनी पुरसीस निशाणी क्र.२३ अन्वये स्विकारली आहे. प्रतिवादींच्या कैफियत मध्ये त्यांनी म्हणणे सादर केले की, वादीने सदर दावा खोट्या व बनावट कथनांच्या आधारे दाखल केला आहे व सदर दावा प्रतिवादींना त्रास देण्याच्या उद्देशाने असल्यामुळे रद्द होण्यास पात्र आहे. नाला सरकारच्या मालकीचा असुन सरकारला पक्षकार केले नाही. त्यामुळे वादीने दाव्यामध्ये आवश्यक पक्षकारांना समाविष्ट न केल्याने व "Non-joinder of necessary party" या तत्त्वाची बाधा येते. तसेच चतुःसिमा चुकीच्या दिल्या आहेत. तसेच प्रतिवादीचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादींना त्यांचे जमीन गट नं.१७४ मध्ये जाणे-येण्यासाठी वादी यांचे गट नं.१७६ तसेच १७१, १७२, १७३ च्या बांधावरुन रस्ता आहे. वादी याने प्रतिवादीच्या सदरच्या रस्त्यावर दगडाची भिंत घालुन रस्ता बंद केला होता. त्या बाबत प्रतिवादी यांनी तहसीलदार यांचेकडे रस्ता खुला होऊन मिळणे साठी केस नं.४२/११ दाखल केला होता. त्याचा निकाल प्रतिवादीच्या बाजुने झाला, तरीही वादीने प्रतिवादींना रस्ता खुला करुन दिला नाही. त्यामुळे प्रतिवादींनी पोलीस मदतीने रस्ता खुला करून घेतला व वहीवाट सुरु केली. त्या बाबत राग वादीला आहे. त्यानंतर वादीने प्रांत साहेब यांचेकडे खोट्या आशयाचे अपिल दाखल करुन तहसीलदार

साहेबाच्या आदेशा विरुध्द मनाई हुकुम मिळविला आहे. याचा गैरफायदा घेऊन वादीने ओढ्यातील माती व दगडे जे. सी. बी. च्या सहाय्याने काढून प्रतिवादीच्या वहीवाटीचा रस्ता बंद केला व त्या ठिकाणी ओढ्यातील माती व दगडे टाकली. त्या बाबत प्रतिवादींनी वादीला पुष्कळ समजावले, परंतु, वादीने ऐकले नाही. उलट प्रतिवादींना त्रास देण्यासाठी वादीने ओढयामध्ये जे. सी. बी. च्या सहाय्याने उकरलेल्या माती व दगडाचा गैर फायदा घेऊन प्रतिवादी विरुध्द सदरचा खोटा दावा दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी जमीनीध्ये पूर्व बाजूने ओढ्यालगत नविन विहीर बांधलेली आहे. त्यामुळे जर वादीने चर खोदला व वळण टाकले तर प्रतिवादीचे विहीरीचे नुकसान होऊन जमीनीची धूप होईल. सदरचा ओढा हा ८ ते १० फुट खोल आहे. त्यामुळे जमीनीची वादीच्या मुळीच धुप होत नाही. तसेच प्रतिवादींची जमीन वादीचे जमीनीपेक्षा कमी उंचावर आहे. वादी हा स्वच्छ हाताने मा. न्यायालयासमोर आलेला नाही. वादी विनाकारण प्रतिवादीं सोबत रस्त्याचे कारणावरून भांडणे करतो. तसेच प्रतिवादींना विनाकारण खर्चात पाडून त्रास देत आहे. या कारणावरुन वादीचा दावा खर्चासह फेटाळण्याची विनंती प्रतिवादींनी केली.

०६. वादी व प्रतिवादींच्या कथनावरुन माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी निशाणी क्र.४५ वर मुद्दे निश्चत केले आहे. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| 1. | Whether the plaintiff proves that the defendants obstructed natural flow of streamlet situated to western side of the suit property ? | No. |

| | | |
|---|---|---|
| 2. | Whether the plaintiff is entitled for relief of mandatory injunction, as prayed ? | No. |
| 3. | Whether the plaintiff is entitled for relief of perpetual injunction, as prayed ? | No. |
| 4. | What order and decree ? | As per final order. |

## – कारणमिमांसा –

०७. दाव्यातील कथने सिध्द करण्याचा भार भारतीय पुरावा कायदा कलम १०१ अन्वये पूर्णतः वादीवर आहे. वादीने दावा सिध्द करण्यासाठी त्याचे स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.५० वर दाखल केले आहे. तसेच वादीतर्फे सा.क्र.०२ रघुनाथ विठोबा राऊत (कमिशनर) याचा उलटतपास साक्ष निशाणी क्र.५९ वर नोंदविण्यात आला आणि सा. क्र.०३ नंदकिशोर रामराव शेळके (निमतानदार) यांची साक्ष निशाणी क्र. ७७ वर नोंदविण्यात आली आहे. या शिवाय वादीने कागदोपत्री पुराव्यामध्ये वाद मिळकतीचा ७/१२ उतारा निशाणी क्र.०८, उप अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालयाचा नकाशा निशाणी क्र. ०९, मोजणी बाबत चलन निशाणी क्र.७८, पूनःमोजणी बाबतची नोटीस निशाणी क्र.७९, पुनः मोजणीचा आदेश निशाणी क्र.८०, वादीस काढलेली नाटीस निशाणी क्र.८१, प्रतिवादींना पाठविलेल्या मोजणीच्या नोटीसच्या आर.पी.ए.डी. पावतया निशाणी क्र.८२, वादी व प्रतिवादींना पाठविलेल्या नोटीसच्या पोहोच पावत्या निशाणी क्र. ८३ ते ९०, मोजणी जबाब पंचनामा निशाणी क्र.९१, मिळकतीच्या ठिकाणचा पंचनामा निशाणी क्र.९२, मोजणी नकाश ब प्रत निशाणी क्र.९३, मोजणी प्रकरण निशाणी क्र.७२ वर ही कागदपत्रे दाखल केली आहेत.

०८. प्रतिवादींनी त्यांच्या कैफियत मधील कथनाच्या पृष्ठयर्थ निशाणी क्र.९६

वर प्रतिवादी क्र.०२ चे सरतपासाचे शपथपत्र दाखल करुन साक्ष नोंदवली आहे व निशाणी क्र.९९ वर पुरसीस दाखल करुन पुरावा संपविला आहे.

०९. दोन्ही पक्षांतर्फे सविस्तर युक्तिवाद ऐकण्यात आला.

**मुद्दा क्र.०१ बाबत...**

१०. वादीने त्याच्या सरतपासाच्या शपथपत्रामध्ये त्याच्या दाव्यातील कथनांचा पुनरुच्चार केला आहे. वादीच्या कथनानुसार दिनांक १८/१२/२०११ रोजी, दावा मिळकतीच्या पश्चिम बाजुला असलेल्या नाल्यातील पाणी आटल्या बरोबर प्रतिवादींनी जे. सी. बी. च्या सहाय्याने नाल्यावर अतिक्रमण केले. नाल्याचा नैसर्गिक प्रवाह खंडीत करुन नाल्यामध्ये वादीच्या विहीरीलगत चर खोदून नाल्यावर वळण टाकुन पाण्याचा प्रवाह पूर्णपणे वादीच्या विहीरीलगत काढुन दिला आहे. जेणेकरुन प्रवाहाच्या जोराने त्याच्या विहीरीचे नुकसान होईल व दावा मिळकतीची धूप होईल. प्रतिवादीच्या वतिने घेतलेल्या उलटतपासात त्याने सदर जे. सी. बी. मशिनचा नंबर तसेच त्यावर चालक होण होता हे माहित नाही असे कथन केले आहे. तसेच सदरचा ओढा दक्षिणोत्तर असुन चर हा दक्षिणोत्तर खोदल्याचे मान्य केले आहे. तसेच नैसर्गिक प्रवाह खंडीत करुन बदलल्या बाबत तक्रार दिल्याचे त्यांचेकडे कोणताही पुरावा नाही असे कथन केले आहे. तसेच त्याने मान्य केले की, न्यायालयीन आयोगाची नेमणुक होऊन सदर घटनास्थळाची पाहणी झाली आहे व त्याने सर्व परिस्थिती कमीशनर यांना दाखविली आहे.

११. साक्षीदाराच्या उलटतपासावरुन स्पष्ट दिसते की, साक्षीदाराला जे. सी. बी. मशिनचा नंबर व त्याचे चालकाचे नाव सांगता आलेले नाही. त्यामुळे तेथे प्रतिवादींनी

जे. सी. बी मशिन आणली होती व नाल्यामध्ये चर खोदला या बाबत शंका उपस्थित होते. तसेच सदर नाला सरकारच्या मालकीचा असल्याने त्यात जर काही अतिक्रमण झाले असेल तर नाल्या लगतच्या शेतक–यांनी सरकारकडे तक्रार करणे आवश्यक आहे. परंतु, वादीने सरकारकडे तक्रार केल्या बाबत कोणतेही कागदपत्र दाखल केले नाही. त्यामुळे प्रतिवादींनी नाल्यात अतिक्रमण केल्या बाबत वादीने सरकारकडे तक्रार केल्याचे दिसुन येते नाही.

१२. तसेच वादीने दिसत्या परिस्थितीची पहाणी करण्यासाठी अर्ज निशाणी क्र.१८ देऊन कोर्ट कमीशनर नेमणुकीची मागणी केली होती. त्यानुसार साक्षीदार क्र.०२ श्री. रघुनाथ विठोबा राऊत, विधिज्ञ यांची कोर्ट कमीशनर म्हणून नियुक्ती करण्यात आली व त्यांनी कमीशन अहवाल निशाणी क्र.३६ सादर केला. वादीस सदर अहवाल मान्य नाही म्हणून वादी तर्फे सदर साक्षीदाराचा उलटतपास नोंदविण्यात आला. त्यामध्ये त्यांनी कथन केले की, प्रतिवादीच्या जमीनीच्या पूर्वेस ओढा आहे व वादीच्या गट क्र.१७६ च्या पूर्वेस रस्ता आहे व पश्चिम बाजुने ओढा आहे. त्याने नाकारले की, प्रतिवादीने ओढयात डबर टाकुन काही क्षेत्र वहिवाटीस घेतले आहे. तसेच त्याने नाकारले की, प्रतिवादींनी ओढयामध्ये जे. सी. बी. च्या सहाय्याने डबर टाकुन अतिक्रमण केले आहे. सदर साक्षीदाराच्या साक्षीवरुन स्पष्ट दिसते की, त्याने कोर्ट कमिशनच्या आदेशान्वये वादी प्रतिवादीच्या जमीनी व त्यांच्यामधील ओढा याच्या दिसत्या परिस्थितीची पहानी केली आहे. तयांच्या पहाणीमध्ये प्रतिवादींनी ओढ्यामध्ये डबर टाकुन अतिक्रमण केल्याचे दिसुन आले नाही. त्यामुळे त्यांच्या साक्षीवरुन

प्रतिवादींनी नाल्यात अतिक्रमण केले हे सिध्द झाले नाही.

१३. साक्षीदार क्र.०३ नंदकिशोर शेळके हा मोजणीदार आहे. त्याच्या साक्षीवरुन असे दिसते की, मोजणीचा अहवाल निशाणी क्र.७२ न्यायालयात दाखल केला आहे. त्यांना पूर्नमोजणी आदेश निशाणी क्र.८० देण्यात आला. त्याप्रमाणे वादीला नोटीस निशाणी क्र.८१ काढण्यात आली. तसेच वादी व प्रतिवादींना आर. पी. ए. डी. ने नोटीसा काढण्यात आल्या. दिनांक १९/१०/२०२३ रोजी, त्यांनी वादी व प्रतिवादी यांनी त्यांची वहिवाट दाखविल्यानंतर रोवर मशिनच्या सहाय्याने वादी प्रतिवादींच्या जमीनींची मोजणी केली. पुढे सदर साक्षीदाराच्या साक्षीवरुन दिसुन येते की, मोजणीच्या वेळी त्यांनी जबाब निशाणी क्र.९१ नोंदविला व पंचनामा निशाणी क्र.९२ केला व त्याप्रमाणे मोजणी नकाशा तयार केला. त्याची ' ब ' प्रत निशाणी क्र.९३ न्यायालयात दाखल केली व ' अ ' प्रत त्यांनी सोबत आणली आहे. सदर दोन्ही प्रती सारख्या असुन त्यावर त्यांची सही आहे. सदर मोजणी प्रकरण अहवाल निशाणी क्र.७२ च्या पत्रान्वये न्यायालयात दाखल केले.

१४. उलटतपासामध्ये त्यांनी मान्य केले की, वादीचा गट क्र.१७६ च्या पश्चिमेला ओढा आहे व ओढ्याचे पश्चिमेला प्रतिवादीचा गट क्र.१७४ आहे. त्यांनी मान्य केले की, नकाशाच्या ' ब ' शिट मध्ये ओढयाचे पश्चिम बाजुला नजरचुकीने गट क्र.१७६ दाखविण्यात आला आहे. त्यांनी मान्य केले की, ओढा १७४ व १७६ च्या मधून आहे. पुढे त्यांनी कथन केले की, मोजणी अहवालानुसार पश्चिम बाजुने ओढ्यावर अतिक्रमण झालेले दिसत नाही. तसेच मोजणी करतांना ओढ्यावर वळण टाकलेले व मोठाले चर

खोदल्याले दिसले नाही. मोजणी नुसार ओढ्यामध्ये ०४ गुंठे क्षेत्र वादीच्या वहिवाटीचे आहे. ओढ्यामध्ये प्रतिवादीचे काही क्षेत्र नाही. गट क्र.१७४ च्या वहिवाटदाराचे ओढ्यामध्ये अतिक्रमण नाही.

१५. सदर वादीचा साक्षीदार क्र.०३ मोजणीदार यांच्या उलटतपासावरुन स्पष्ट दिसते की, ओढ्यामध्ये कोणतेही वळण टाकलेले अथवा चर खणलेले नाही. तसेच गट क्र.१७४ चा वहिवाटदार म्हणजेच प्रतिवादी याचे ओढ्यामध्ये अतिक्रमण नाही. या उलट, वादीचे ओढ्यामध्ये ४ गुंठे क्षेत्रावर अतिक्रमण असल्याचे सदर मोजणीदाराच्या साक्षीवरुन दिसुन येते. तसेच मोजणी नकाशा निशाणी क्र.९३ मध्ये देखील वादीचा गट क्र.१७६ च्या पश्चिमेस व प्रतिवादीचा गट क्र.१७४ च्या पूर्वेस म्हणजेच वादी व प्रतिवादीच्या मिळकतींच्या बांधालगत मध्ये दक्षिणोत्तर नाला दर्शविला असुन नाल्यावर पूर्व बाजुने वादीचे ०.०४ आर. क्षेत्रावर अतिक्रमण असल्याचे दर्शविले आहे. सदर नकाशावरुन स्पष्ट दिसते की, नाल्यावर प्रतिवादीचे अतिक्रमण नसुन वादीचे ०.०४ आर. क्षेत्रावर अतिक्रमण आहे.

१६. प्रतिवादींनी वादीची वाद मिळकतीवरील मालकी व कब्जे वहिवाटी व्यतिरिक्त सर्व दावा नाकारला आहे व त्या पृष्टयर्थ दिलेले प्रतिवादी क्र.०२ चे सरतपासाचे शपथपत्र यामध्ये त्याने कथन केले आहे की, त्यांची जमीन गट क्र.१७४ मध्ये जाणे येण्यासाठी वादी यांचे गट क्र.१७६ तसेच १७१, १७२ व १७३ च्या बांधावरुन रस्ता आहे व वादी याने प्रतिवादी यांच्या सदर रस्त्यावर दगडाची भिंत घालून रस्ता बंद केला होता. सदर रस्ता खुला करुन मिळणेसाठी प्रतिवादींनी केस नंबर

४२/११ दाखल केला होता. प्रतिवादींनी सदर निकाल त्यांच्या बाजुने झाल्यानंतर पोलीस संरक्षणात रस्ता खुला करुन घेऊन वहिवाट सुरु केली. वादीने प्रांत साहेबाकडे खोट्या आशयाचे अपिल करुन तहसिलदार यांच्या आदेशा विरुध्द मनाई हुकूम मिळवला व त्याचा गैरफायदा घेवून ओढ्यातील माती व दगडे जे सी बी च्या सहाय्याने काढुन प्रतिवादींचा वहिवाटीचा रस्ता बंद केला व त्या ठिकाणी ओढ्यातील माती व दगडे टाकले व त्याचा गैरफायदा घेऊन प्रतिवादीं विरुध्द खोटा दावा दाखल केला.

१७. वादी तर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, त्यांनी त्यांच्या शेतात ओढ्या लगत विहीर खोदली आहे. परंतु त्यांनी हे नाकारले की, विहीरीचे डबर ओढ्यात टाकले व अतिक्रमण केले. त्यांनी नाकारले की, सदर अतिक्रमणामुळे ओढयाचा नैसर्गिक प्रवाह बदलला. तसेच त्यांनी नाकारले की, गट क्र.१७४ मध्ये जाण्यासाठी पश्चिम बाजुने जुना घोटण ते पाथर्डी रोडला मिळणारा गट क्र.१५४ ते १७५ च्या बांधावरुन प्रतिवादींना रस्ता आहे.

१८. प्रतिवादीने दिलेल्या साक्षीवरुन असे दिसते की, वादीच्या उत्तर बाजुच्या बांधावरुन प्रतिवादींना वहिवाट रस्ता असुन त्या बाबत वादी व प्रतिवादींमध्ये वाद आहेत व सदर वाद प्रकरणे महसूल विभागामध्ये प्रलंबित आहे. तसेच वादीच्या वतिने प्रतिवादीच्या उलटतपासात प्रतिवादीने विहीर खणून त्याचे डबर ओढ्यात टाकले व अतिक्रमण केल्याचे कथन अभिलेखावर आणले आहे. परंतु, वादीने त्याच्या दाव्यामध्ये नाल्यातील पाणी आटल्या बरोबर प्रतिवादींनी नाल्यामध्ये वादीच्या विहीरीलगत चर खोदून नाल्यावर वळण टाकुन नाल्याचा नैसर्गिक प्रवाह खंडीत करुन जे. सी. बी. च्या

सहाय्याने अतिक्रमण केले आहे असे कथन केले आहे. परंतु, दाव्यातील सदर तथ्यकथनांबाबत वादीच्या वतिने प्रतिवादीच्या साक्षीदारास कोणतेही सूचक प्रश्न विचारण्यात आले नाही. या उलट, नविन कथा तयार करुन प्रतिवादीने त्याची विहीर खोदल्यानंतर त्यातील निघालेले डबर नाल्यात टाकुन अतिक्रमण केले अशी नविन कहाणी अभिलेखावर आणली आहे. त्यामुळे वादीचे दाव्यातील कथने विश्वास पात्र नाहीत हे सिध्द होते.

१९ वरती चर्चा केल्याप्रमाणे वाद मिळकतीच्या पश्चिम बाजुस असलेल्या नाल्यावर प्रतिवादींनी चर खोदुन नाल्यावर वळण टाकुन अतिक्रमण केले आहे हे वादीने सिध्द केले नाही. त्यामुळे मुद्दा क्र.०१ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येते.

**मुद्दा क्र.०२ व ०३ बाबत –**

२०. ज्या अर्थी वादीने हे सिध्द केले नाही की, प्रतिवादीने वाद मिळकतीच्या पश्चिम बाजुस लगत असलेल्या नाल्यामध्ये जे सी बी मशिनच्या च्या सहाय्याने, चर खोदून नाल्याचा प्रवाह वळवून अतिक्रमण केले, त्या अर्थी वादी अनिवार्य व निरंतर मनाई हुकूम मिळण्यास पात्र नाही. सबब, मुद्दा क्र.०२ व ०३ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येते.

**मुद्दा क्र.०४ करीता.**

२१. वरती केलेल्या एकंदरीत चर्चेवरुन मुद्दा क्र.०१ ते ०३ च्या निष्कर्षावरुन मुद्दा क्र.०४ चे उत्तरादाखल खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**–ः आ दे श ः–**

(१) दावा खर्चासह फेटाळण्यात येतो.

(२) या प्रमाणे हुकुमनामा तयार करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर.)

VAISHALI SANJAY MORE

Digitally signed by VAISHALI SANJAY MORE
Date: 2026.04.24 16:40:54 +0530

दिनांक – २४/०४/२०२६

( वैशाली सं. मोरे )
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
शेवगाव.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file judgment are same word for word as per original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | :- | Vaishali S. More,<br>Jt. Civil Judge Jr. Div., Shevgaon. |
| Name of Steno | :- | S. B. Pisal, Stenographer (G-3) |
| Date of Decision Judgment | :- | 24/04/2026 |
| Signed by Presiding Officer on | :- | 24/04/2026 |
| Judgment upload on | :- | 24.04.2026 |